**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या उद्याच्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाचं व्यापक नियोजन

- मतदानाच्या अंतिम आकडेवारीनुसार राज्यात सरासरी ६६ पूर्णांक ५ शतांश टक्के, तर कोल्हापूरच्या करवीर मतदार संघात सुमारे ८५ टक्के मतदान

- निकालांच्या आधी राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग

- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स सुमारे २ हजार आणि निफ्टी साडे पाचशे अंकांनी वधारला

**आणि**

- बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा पहिला डाव १५० धावांवर समाप्त, ऑस्ट्रेलियाचीही दाणादाण

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीची सुरुवात टपाली मतांच्या मोजणीपासून होईल आणि त्यानंतर साधारण साडेआठ वाजल्यापासून मतदान यंत्रावरच्या मतांची मोजणी सुरू होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. मतमोजणीसाठी चोख व्यवस्था केली असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सांगितलं.....

**होल्ड - बाईट - एस. चोक्कलिंगम**

२८८ विधानसभा मतदारसंघांमधल्या मतमोजणीसाठी तितकीच मोजणी केंद्रं काम करणार आहेत, शिवाय नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी एक मोजणी केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे ६ हजार ६०० पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. मतमोजणीच्या प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर असणार आहे. दुपारी बाराच्या सुमाराला पहिले निकाल हातात येतील, मात्र मतदारसंघाच्या आकारमानानुसार यात फरक पडू शकतो. संध्याकाळी निकालाचं पूर्ण चित्र स्पष्ट होईल, असं चोक्कलिंगम यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मतदान यंत्र ठेवलेल्या स्ट्रॉंगरूमला त्रिस्तरीय सुरक्षाकवच देण्यात आलं असून, शंभर मीटर परिसरात कोणालाही प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे ईव्हीएम अथवा स्ट्रॉंग रूमबाबत कोणत्याही प्रकारच्या अफवेवर विश्वास ठेवू नये, असं निवडणूक निर्णय अधिकारी आकाश लिगाडे यांनी सांगितलं. चिपळूणमध्ये मतदानयंत्रात छेडछाड करण्याच्या हेतूने काही जण थांबले असल्याची तक्रार एका पक्षकार्यकर्त्याने दाखल केली होती त्या संदर्भात लिगाडे यांनी खुलासा केला.

**नवी मुंबई**तल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असलेले स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांच्यावर काल कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर मोरे यांचा मुलगा जयेश मोरे याला मारहाण केल्याची तक्रार मोरे यांनी केली होती, त्यावरून कदम यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**धुळे** शहरात मतदान यंत्र घेऊन जाणारे वाहन अडवून निवडणूक अधिकाऱ्याला धमकी देणाऱ्या तरुणासह ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळ्यातल्या अभय कॉलेजजवळ काल ही घटना घडली होती.

**<><><><><>**

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवारी २० नोव्हेंबरला झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. त्यानुसार राज्यात सरासरी ६६ पूर्णांक ५ शतांश टक्के मतदान झालं. यात कोल्हापूरच्या करवीर मतदार संघात सर्वाधिक ८४ पूर्णांक ९६ शतांश, म्हणजे जवळजवळ ८५ टक्के मतदान झालं. त्याखालोखाल चिमूरमधे ८१ पूर्णांक ९५ शतांश, नवापूरमधे ८१ पूर्णांक १५ शतांश, ब्रह्मपुरी ८० पूर्णांक ५४ शतांश, तर सिल्लोड मतदार संघात ८० पूर्णांक ८ शतांश टक्के मतदान झालं.

राज्यभरात यावेळी मतदानात एकूण ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी सहभाग नोंदवला. यामध्ये एकूण ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरूष, ३ कोटी ६ लाख ४९ हजार ३१८ महिला, तर १ हजार ८२० इतर मतदारांनी मतदान केलं.

यात प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांचा समावेश आहे. मतमोजणी करतांना टपाली मतदानाचा समावेश करण्यात येईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंडच्या विधानसभा निवडणुकांप्रमाणेच देशातल्या ४८ विधानसभा मतदारसंघातल्या तसंच लोकसभेच्या २ मतदारसंघातल्या निवडणुकांची मतमोजणीदेखील उद्या होणार आहे. महाराष्ट्रात नांदेड आणि केरळात वायनाड या लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली होती.

विधानसभेसाठी उत्तरप्रदेशातल्या ९, राजस्थानातल्या ७, पश्चिमबंगालमधल्या ६, आसाममधे ५, बिहार आणि पंजाबमधे प्रत्येकी ४, कर्नाटकात ३ मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. केरळ, मध्य प्रदेश आणि सिक्किममधे प्रत्येकी दोन जागांसाठी तर छत्तीसगड, गुजरात, आणि उत्तराखंडमधे प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक झाली.

**<><><><><>**

राज्य विधानसभा निवडणुकांच्या निकालांच्या पार्श्वभूमीवर, महायुती आणि महाविकास आघाडीतील राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजूंकडच्या नेत्यांनी  सत्तेत येण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. निकालांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सागर बंगल्यावर आज भाजपा नेत्यांची बैठक झाली. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी भाजपा प्रदेश कार्यालयातल्या बैठकीत घडामोडींचा आढावा घेतला.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या उमेदवारांची आज बैठक होत असल्याचं प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाचा निर्णय दिल्लीत नाही तर महाराष्ट्रातच होईल, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी म्हटलं आहे.  महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात उद्धव ठाकरे यांनी उत्तमरित्या राज्य चालवलं आणि म्हणूनच आताही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात सरकार बनवण्याचा प्रयत्न करु, असं ते म्हणाले. अपक्ष आणि छोट्या पक्षांकडूनही चाचपणी सुरु आहे.

निकालानंतर सरकारस्थापनेचा दावा करणाऱ्यांसोबत राहण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केला आहे. असाच निर्णय बसपा अध्यक्ष मायावती यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या अनुषंगानं, आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्त विभागातर्फे उद्या सकाळी ९ वाजल्यापासून रात्री पावणे नऊ वाजेपर्यंत '**निवाडा जनतेचा**' हा विश्लेषणपर चर्चात्मक कार्यक्रम सादर केला जाणार आहे. त्याबरोबरच सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत दर तासाला निवडणूक

विशेष बातमीपत्रं दिली जातील. शिवाय सविस्तर माहिती श्रोत्यांपर्यंत पोचवण्यासाठी आमच्या नेहमीच्या बातमीपत्रांचा अवधीही उद्यासाठी वाढवला जाईल.

तेव्हा, ऐकायला विसरु नका, उद्या राज्यातल्या सर्व आकाशवाणी केंद्रांवर, सकाळी ९ पासून, '**निवाडा जनतेचा**'.

**<><><><>**

भारतीय शेअर बाजारात आज तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज १ हजार ९६१ अंकांची वाढ झाली आणि तो ७९ हजार ११७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीही ५५७ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ९०७ अंकांवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारात नोंदणी असलेल्या सर्व कंपन्यांमध्ये आज वाढ दिसून आली. यात बँकिंग, संपर्क, माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातल्या कंपन्यांचा समावेश आहे.

**<><><><>**

ऑस्ट्रेलियात पर्थ इथं बॉर्डर-गावस्कर करंडकाच्या पहिल्या कसोटीचा पहिला दिवस गाजवला तो गोलंदाजांनी. सामन्याच्या पहिल्याच दिवशी दोन्ही संघांचे मिळून १७ गडी बाद झाले.

आज सकाळी सामन्याला सुरुवात झाली तेव्हा भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. परंतु कांगारूंच्या प्रभावी माऱ्यामुळे भारतीय फलंदाज निष्प्रभ झाले आणि १५० धावांवर पहिला डाव संपला. ऑस्ट्रेलियाकडून जोश हेझलवुड यानं चार गडी बाद केले. तर मायकल स्ट्राक, पीट कमिन्स,मिशेल मार्श यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या यजमानांची सुरुवातही अडळखत झाली. भारतीय संघाचा कर्णधार जसप्रीत बुमराहच्या प्रभावी गोलंदाजीपुढे ऑस्ट्रेलियन

फलंदाज टिकू शकले नाही. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ७ गडी बाद ६७ धावा झाल्या होत्या. भारताकडून जसप्रित बुमराहनं चार, मोहम्मद सिराज यानं दोन, हर्षित राणा यानं एक गडी बाद केला.

**<><><><>**

मध्य भारतातलं सर्वात मोठं कृषी प्रदर्शन ‘ॲग्रोव्हिजन’चं आज, नागपूरजवळ दाभा इथं उद्घाटन झालं. उद्घाटनानंतर मुख्य सभागृहात 12 वाजता ‘विदर्भातील दुग्धव्यवसाय वाढीच्या संधी’ विषयावर महत्वाची परिषद झाली. भारतातील कृषी उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, विविध राज्ये, कृषी विद्यापीठे, प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्था यात सहभागी झाल्या आहेत. या प्रदर्शनाची यावर्षीची संकल्पना 'शेतकरी सक्षमीकरणासाठी यंत्र,तंत्र आणि व्यापार वाढीचे मंत्र, अशी आहे. ४०० हून अधिक कंपन्यानी आपला सहभाग ॲग्रो व्हिजन मधे निश्चित केला आहे.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं १२ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहिल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**